Epaper
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843
दैनिक जन सम्राट टाईम्स
सत्याचे प्राईम्स
मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे
। मंगळवार, दि. २६ मे २०२६ । वर्ष १ । अंक ५१ । पाने २ ।
DIGITAL EDITION



डिझेल टंचाईने खरीप हंगाम धोक्यात

(पान २ वर)

Selected

## राहुल गांधी पाकिस्तानी एजंट : मंत्री नितेश राणे

नाशिक | राज्याचे मत्स्यव्यवसाय व बंदरे खात्याचे मंत्री नितेश राणे यांनी लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्यावर जोरदार टीका केली. मंत्री राणे यांनी काँग्रेस नेते राहुल गांधी 'पाकिस्तानी एजंट' म्हणून काम करत असल्याचा आरोप केला. "राहुल गांधींची वक्तव्ये बाहेरील सूत्रधारांच्या आधारावर असतात", अशी टीका राणेंनी केली. "सध्याच्या आर्थिक संकटामुळे एनडीए सरकार पुढच्या वर्षापर्यंत टिकणार नाही", असे राहुल गांधी म्हणाले होते, याला राणेंनी उत्तर दिले.देशातील आर्थिक संकटावर राहुल गांधींनी भाष्य करताना पुढच्या वर्षापर्यंत एनडीए सरकार टिकणार नाही अशा शब्दात टीका केली. राहुल गांधी हे सीमेपलीकडील हितसंबंधांना खूश करण्याच्या उद्देशानेच बोलत असल्याचा आरोप नितेश राणेंनी केला. काँग्रेसच्या अल्पसंख्याक विभागाच्या सल्लागार परिषदेच्या बैठकीदरम्यान राहुल गांधींनी केंद्र सरकार आणि पंतप्रधान मोदींवर टीका केली होती.

### जळगाव विधान परिषद निवडणुकीत महायुतीत जागावाटपावरून तणाव

# जळगाव विधान परिषद निवडणुकीत महायुतीत रस्सीखेच

## शिंदेसेनेचा 'मैत्रीपूर्ण लढती'चा इशारा, अर्ज प्रक्रियेला सुरुवात; पहिल्याच दिवशी १६ जणांनी घेतले २५ अर्ज

जन सम्राट टाईम्स

**जळगाव । स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या विधान परिषद निवडणुकीची रणधुमाळी आता जोर धरू लागली असून जळगाव जिल्ह्यात राजकीय घडामोडींना वेग आला आहे. सोमवारी उमेदवारी अर्ज दाखल प्रक्रियेला सुरुवात झाली असून पहिल्याच दिवशी १६ इच्छुक उमेदवारांनी तब्बल २५ अर्ज घेतल्याने निवडणुकीत चुरस वाढण्याची चिन्हे दिसू लागली आहेत.**

दरम्यान, जळगाव विधान परिषदेची जागा मिळवण्यासाठी भाजप आणि शिंदेसेनेत सुरू असलेली रस्सीखेच अधिक तीव्र झाली असून, जागा न मिळाल्यास 'मैत्रीपूर्ण लढत' करण्याचा इशारा शिंदेसेनेच्या आमदारांनी दिला आहे. राज्यातील १७ स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघांसाठी विधान परिषद निवडणूक जाहीर झाली असून २५ मे ते १ जूनदरम्यान उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत निश्चित करण्यात आली आहे. त्यानुसार सोमवारी पहिल्याच दिवशी उद्धवसेनेचे शरद तायडे, डी. डी. वाणी यांच्यासह विविध इच्छुकांनी उमेदवारी अर्ज घेतले. अर्जांची छाननी २ जून रोजी होणार असून त्याच दिवशी अधिकृत उमेदवारांची यादी



जाहीर केली जाणार आहे. ४ जूनपर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेता येणार असून २२ जून रोजी मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. जिल्ह्यात महायुतीचे संख्याबळ भक्कम असले तरी भाजपइतकीच शिंदेसेनेची ताकद असल्याचा दावा करत जळगाव विधान परिषद मतदारसंघाची जागा शिंदेसेनेला मिळावी, अशी भूमिका पक्षाच्या आमदारांनी घेतली आहे. शहरातील एका हॉटेलमध्ये रविवारी झालेल्या बैठकीत याबाबत सविस्तर चर्चा झाली. पालकमंत्री गुलाबराव पाटील, आमदार किशोर पाटील, प्रा. चंद्रकांत सोनवणे, चंद्रकांत पाटील, अमोल पाटील, माजी खासदार उन्मेष पाटील, माजी आमदार शिरीष चौधरी, जिल्हाप्रमुख विष्णू भंगाळे आणि महिला संपर्कप्रमुख सरिता माळी-कोल्हे यांच्यासह प्रमुख नेते उपस्थित होते. बैठकीनंतर शिंदेसेनेचे जिल्हा संपर्कप्रमुख दिलीप लांडे यांनी पत्रकारांशी बोलताना स्पष्ट इशारा दिला की, "जळगावची जागा शिंदेसेनेला मिळावी यासाठी आम्ही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे मागणी करणार आहोत. जर ही जागा मिळाली नाही तर मैत्रीपूर्ण लढतीसाठी परवानगी द्यावी, अशी मागणी करण्यात येईल."

### भुसावळ बैठकीत नगरसेवकांची मोठी उपस्थिती

दरम्यान, विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भुसावळ येथेही राजकीय हालचालींना वेग आला आहे. भुसावळचे माजी नगराध्यक्ष अनिल चौधरी यांनी सोमवारी आयोजित केलेल्या बैठकीत तब्बल १०९ नगरसेवक उपस्थित असल्याचा दावा करण्यात आला. आगामी निवडणुकीत नवीन समीकरणे तयार होण्याचे संकेत या बैठकीतून मिळत असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. बैठकीत चाळीसगाव, शेंदुर्णी, जामनेर, नशिराबाद, वरणगाव, यावल, फैजपूर, बोदवड आणि भुसावळ येथील नगरसेवक सहभागी झाले होते. याशिवाय अनेक माजी नगराध्यक्ष, माजी नगरसेवक आणि स्थानिक स्वराज्य संस्थांतील पदाधिकारी उपस्थित होते. काही नगरसेवकांनी यावेळी आपली भूमिका स्पष्ट करत आगामी निवडणुकीत बदलते राजकीय समीकरण महत्त्वाची ठरणार असल्याचे मत व्यक्त केले. एकंदरीत, विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जळगाव जिल्ह्यातील राजकीय वातावरण तापू लागले असून महायुतीतील जागावाटपाचा तिढा आगामी काळात आणखी रंगण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

# मोकाट कुत्र्याने घेतला तरुणाचा बळी!

## रेबीजमुळे ३० वर्षीय तरुणाचा अंत

जन सम्राट टाईम्स

**जळगाव | प्रतिनिधी:** भुसावळातील ९ वर्षीय बालकाच्या मृत्यूची घटना ताजी असतानाच जळगाव शहरातही मोकाट कुत्र्यांच्या दहशतीने आणखी एका तरुणाचा जीव घेतला आहे. पिंप्राळा-हुडको परिसरात पिसाळलेल्या कुत्र्याच्या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या ३० वर्षीय तरुणाचा रेबीजमुळे मृत्यू झाल्याने शहरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. शेख ताहेर शेख फारुख (वय ३०, रा. पिंप्राळा-हुडको) असे मृत तरुणाचे नाव असून, गेल्या १२ दिवसांत जिल्ह्यात रेबीजमुळे झालेला हा दुसरा मृत्यू आहे. मृत शेख ताहेर हा हातमजुरी करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करत होता. २५ एप्रिल रोजी घराजवळ अचानक एका मोकाट व पिसाळलेल्या कुत्र्याने त्याच्यावर तसेच परिसरातील सात ते आठ जणांवर हल्ला चढवला होता. या भीषण हल्ल्यात ताहेरच्या हाताचे अक्षरशः लचके तोडण्यात आले होते. रक्तबंबाळ अवस्थेत त्याला तातडीने जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. हल्ल्यानंतर ताहेरने अँटी-रेबीज लस (ARV) घेतली होती. मात्र डॉक्टरांच्या म्हणण्यानुसार त्याची जखम अतिशय गंभीर स्वरूपाची



असल्याने लसीसोबत रेबीज इम्युनोग्लोब्युलिन (सिरम) घेणे अत्यावश्यक होते. दुर्दैवाने ते सिरम वेळेत घेण्यात आले नाही. त्यानंतर महिनाभराने २१ मे रोजी अचानक त्याची प्रकृती बिघडली आणि त्याला रेबीजची लक्षणे दिसू लागली. तातडीने उपचारासाठी दाखल करण्यात आले असले तरी २२ मे रोजी पहाटे १:२५ वाजता त्याची प्राणज्योत मालवली.

### नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण

लहान मुलांना बाहेर खेळण्यासाठी पाठवण्यासही नागरिक घाबरत असल्याचे चित्र आहे.मोकाट कुत्र्यांचे टोळके रस्त्यांवर फिरत असल्याने नागरिक त्रस्त झाले आहेत. तातडीने विशेष मोहीम राबवून मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करावा, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून होत आहे. अन्यथा भविष्यात आणखी गंभीर घटना घडू शकतात, अशी भीती व्यक्त केली जात आहे.

# चांगदेव परिसरातील विद्युत प्रश्नांवर शिवसेनेचे महावितरण कार्यालयात ठिय्या आंदोलन

जन सम्राट टाईम्स

**मुक्ताईनगर | प्रतिनिधी:** चांगदेव आणि परिसरातील गावांमधील शेतकऱ्यांच्या प्रलंबित विद्युत समस्यांवरून आज शिवसेनेच्या वतीने महावितरण कार्यालयात ठिय्या आंदोलन करण्यात आले. ऐन पावसाळा तोंडावर असताना वीजपुरवठा, शेतीपंप जोडणी आणि इतर तांत्रिक अडचणींबाबत अनेक दिवसांपासून पाठपुरावा करूनही कोणतीही ठोस कार्यवाही होत नसल्याचा आरोप करत शिवसैनिक आणि शेतकरी बांधवांनी आक्रमक भूमिका घेतली. "जोपर्यंत लेखी आश्वासन मिळत नाही, तोपर्यंत आंदोलन मागे घेणार नाही," असा ठाम इशारा आंदोलनकर्त्यांनी दिला. चांगदेव परिसरातील अनेक गावांमध्ये शेतकऱ्यांना गेल्या काही दिवसांपासून अनियमित वीजपुरवठा, शेतीपंपांच्या जोडणीतील विलंब आणि देखभाल-दुरुस्तीची कामे रखडल्याने अडचणींचा सामना करावा लागत आहे. पावसाळा




सुरू होण्याच्या उंबरठ्यावर शेतीची कामे वेगाने सुरू असताना वीजपुरवठा सुरळीत नसल्याने शेतकरी चिंतेत आहेत. वारंवार तक्रारी करूनही महावितरणचे अधिकारी आणि संबंधित ठेकेदारांकडून अपेक्षित प्रतिसाद मिळत नसल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजी वाढली होती. या पार्श्वभूमीवर आमदार चंद्रकांतभाऊ पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेना पदाधिकाऱ्यांनी महावितरण कार्यालय गाठत शाखा अभियंता चौहान यांच्या दालनात ठिय्या आंदोलन सुरू केले. यावेळी शेतकऱ्यांच्या विविध प्रलंबित कामांची माहिती देणारे निवेदन अधिकाऱ्यांकडे सादर करण्यात आले. परिसरातील शेतकऱ्यांच्या वतीने वीजपुरवठा नियमित करणे, प्रलंबित जोडण्या पूर्ण करणे आणि दुरुस्तीची कामे तातडीने मार्गी लावावीत, अशी मागणी करण्यात आली. आंदोलनादरम्यान शेतकरी आणि शिवसेना पदाधिकाऱ्यांनी अधिकाऱ्यांसमोर तीव्र नाराजी व्यक्त केली. अनेक दिवसांपासून समस्या मांडूनही ठोस निर्णय होत नसल्याने आता रस्त्यावर उतरावे लागत असल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले. शेतीच्या हंगामात वीजपुरवठा खंडित राहिल्यास त्याचा थेट परिणाम पिकांवर होणार असल्याने प्रशासनाने याकडे गंभीरतेने लक्ष देणे आवश्यक असल्याचे आंदोलनकर्त्यांनी स्पष्ट केले. अखेर संबंधित अधिकाऱ्यांनी प्रलंबित कामे मार्गी लावण्याबाबत लेखी आश्वासन दिल्यानंतर आंदोलन तात्पुरते मागे घेण्यात आले. मात्र पुढील तीन दिवसांत प्रत्यक्ष कामांना सुरुवात झाली नाही, तर अधिक तीव्र स्वरूपाचे आंदोलन आणि बेमुदत उपोषण छेडण्यात येईल, असा इशाराही शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी दिला आहे.

# नाशिक विधान परिषद जागेवरून महायुतीत तणाव

## भाजप-शिवसेनेचे अजूनही जुळेना सूत

जन सम्राट टाईम्स

**नाशिक | प्रतिनिधी :** विधान परिषद स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघ निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नाशिक जिल्ह्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापले असून महायुतीतील जागावाटपाचा तिढा अद्याप कायम आहे. सोमवारी उमेदवारी अर्ज दाखल प्रक्रियेला सुरुवात झाली असली तरी नाशिकची जागा भाजपकडे जाणार की शिवसेनेकडे, याबाबत अंतिम निर्णय न झाल्याने इच्छुकांची धावपळ वाढली आहे. मुंबई आणि जळगाव येथे इच्छुकांच्या बैठका, संपर्क आणि राजकीय लॉबिंगला वेग आला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही नाशिकच्या जागेबाबत अंतिम निर्णय अद्याप झालेला नसल्याचे स्पष्ट केल्याने महायुतीतील अनिश्चितता आणखी वाढली आहे. नाशिकसह परभणी, छत्रपती संभाजीनगर आणि ठाणे या चार जागांवर अजूनही महायुतीत एकमत झालेले नसल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे. त्यामुळे जागावाटपाचा अधिकृत फॉर्म्युला जाहीर होण्यास विलंब होत आहे. नाशिक-जळगाव अदलाबदलीची चर्चा राजकीय वर्तुळात सध्या नाशिक आणि जळगावच्या जागांमध्ये अदलाबदल होण्याची जोरदार चर्चा सुरू आहे. जळगावची जागा शिंदेसेनेकडे आणि नाशिकची जागा भाजपकडे जाण्याची शक्यता व्यक्त केली जात असल्याने दोन्ही पक्षांतील इच्छुक अधिक सक्रिय झाले आहेत. काही इच्छुकांनी जळगावमध्ये जाऊन वरिष्ठ नेत्यांशी संपर्क साधल्याची चर्चा आहे,



तर शिवसेनेतील इच्छुकांनी मुंबईत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेण्यासाठी ठाण मांडल्याचे सांगितले जात आहे. भाजपमध्ये इच्छुकांची गर्दी नाशिकच्या जागेसाठी भाजपमध्ये इच्छुकांची संख्या दिवसेंदिवस वाढत चालली आहे. गणेश गिते, नीलेश बोरां यांच्यासह डझनभर इच्छुकांनी फिल्डिंग लावली असतानाच भाजपचे आमदार डॉ. राहुल आहेर यांचे बंधू आणि 'नाफेड'चे संचालक केदा आहेर यांनीही विधान परिषद निवडणुकीसाठी उडी घेतल्याने राजकीय चर्चांना उधाण आले आहे. केदा आहेर यांनी सोमवारी जिल्हाधिकारी कार्यालयातून उमेदवारी अर्ज घेतल्याने भाजपमधील इतर इच्छुकांचे राजकीय गणित बिघडण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. आहेर यांचे विविध पक्षांतील नेत्यांशी असलेले संबंध आणि स्थानिक स्वराज्य संस्थांमधील प्रभाव लक्षात घेता ते अपक्ष उमेदवार म्हणूनही रिंगणात उतरण्याची शक्यता वर्तवली जात आहे. महाविकास आघाडीचीही नजर दरम्यान, केदा आहेर यांच्याशी महाविकास आघाडीतील काही नेते संपर्कात असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगू लागली आहे. त्यामुळे नाशिक विधान परिषद निवडणूक अधिकच रंगतदार होण्याची चिन्हे दिसत आहेत.

# पावसाने चोपडा तालुक्यातील केळी पिकाचे मोठे नुकसान

## अनेक गावांतील वीजपुरवठा खंडित

जन सम्राट टाईम्स

**चोपडा | प्रतिनिधी :** चोपडा तालुक्यातील पूर्व भागात गेल्या दोन दिवसांपासून झालेल्या वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. विशेषतः केळी पिके आडवी झाल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडले असून अनेक गावांमध्ये वीजपुरवठाही खंडित झाला आहे. नुकसानग्रस्त भागाची पाहणी करत आमदार प्रा. चंद्रकांत सोनवणे यांनी तात्काळ पंचनामे करण्याचे आदेश प्रशासनाला दिले आहेत. अडावद, धानोरा परिसरात गेल्या दोन दिवसांपासून जोरदार वादळी वाऱ्यासह पाऊस झाला. काही ठिकाणी गारपिटीचीही नोंद झाली असून त्यामुळे शेतातील केळी पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांनी मोठ्या आशेने उभे केलेले पीक अक्षरशः जमिनीवर कोसळल्याने हवालदिल झालेल्या शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. वादळी वाऱ्याच्या तडाख्यामुळे पंचक येथील जिल्हा परिषद शाळेचे पत्रे उडून गेले, तर खर्डी येथे घरांवर झाडे कोसळल्याने घरांचे नुकसान झाले आहे. तसेच बिडगाव, वरगव्हाण, खर्डी, लोणी आणि पंचक या गावांमध्येही मोठ्या प्रमाणावर हानी झाल्याचे समोर आले आहे. या पार्श्वभूमीवर आमदार प्रा. चंद्रकांत सोनवणे यांनी तहसीलदार भाऊसाहेब थोरात, तालुका कृषी अधिकारी दीपक साळुंखे आणि गटविकास अधिकारी अंजली बरगे यांच्यासह नुकसानग्रस्त भागाची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी त्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधून त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. नुकसान झालेल्या पिकांचे तात्काळ पंचनामे करून शेतकऱ्यांना



शासनाकडून जास्तीत जास्त मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे आश्वासन आमदार सोनवणे यांनी दिले. वादळी वाऱ्यामुळे अनेक ठिकाणी विजेचे खांब कोसळल्याने गावांचा वीजपुरवठा खंडित झाला आहे. काही गावांमध्ये दोन ते तीन दिवसांपासून वीज नसल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

### ग्रामस्थांकडून तातडीच्या मदतीची मागणी

विशेषतः पिण्याच्या पाण्याची समस्या गंभीर बनली असून महिला व लहान मुलींना डोक्यावर हंडे घेऊन पाण्यासाठी भटकंती करावी लागत असल्याचे विदारक चित्र समोर आले आहे. परिस्थितीची गंभीरता लक्षात घेत आमदार सोनवणे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना भ्रमणध्वनीवरून तात्काळ सूचना देत बंद असलेला वीजपुरवठा लवकरात लवकर सुरळीत करण्याचे आदेश दिले. प्रशासनानेही नुकसानीचे पंचनामे जलदगतीने पूर्ण करून शेतकऱ्यांना दिलासा देण्याची प्रक्रिया सुरू केल्याची माहिती मिळाली आहे. वादळी पाऊस, गारपीट आणि वीजपुरवठा खंडित झाल्याने चोपडा तालुक्यातील जनजीवन विस्कळीत झाले असून शेतकरी व ग्रामस्थांकडून तातडीच्या मदतीची मागणी होत आहे.

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

# गरिबांच्या मुलांनाही मिळणार अधिकारी होण्याची संधी

## जळगावात ५० विद्यार्थ्यांसाठी मोफत निवासी स्पर्धा परीक्षा केंद्र सुरू

जन सम्राट टाईम्स

**जळगाव | प्रतिनिधी :** आर्थिक परिस्थितीमुळे स्पर्धा परीक्षांचे स्वप्न अपूर्ण राहणाऱ्या ग्रामीण आणि गरजू विद्यार्थ्यांसाठी जळगावात आशेचा नवा किरण निर्माण झाला आहे. सतपंथ चॅरिटेबल ट्रस्ट आणि नोबेल फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने जळगाव, धुळे आणि नंदुरबार जिल्ह्यातील ५० गरजू युवक-युवतींसाठी विनामूल्य निवासी स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण केंद्र सुरू करण्यात आले आहे. या केंद्रात UPSC, MPSC, JEE आणि NEET परीक्षांसाठी विद्यार्थ्यांना संपूर्ण मोफत प्रशिक्षण दिले जाणार आहे. या प्रशिक्षण केंद्राच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना परमपूज्य महामंडलेश्वर जनार्दन हरीजी महाराज यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. "देशाला आज सुसंस्कृत, प्रामाणिक आणि कर्तव्यदक्ष अधिकाऱ्यांची नितांत गरज आहे. तरुणांनी प्रशासकीय सेवेत येऊन आपल्या कर्तृत्वातून देशाच्या विकासात योगदान द्यावे. स्पर्धा परीक्षेत यश मिळवण्यासाठी सातत्यपूर्ण अभ्यास, संयम आणि कठोर परिश्रम हाच यशाचा खरा मंत्र आहे," असे ते म्हणाले."प्रत्येक बाबा भोंदू नसतो"; अंधश्रद्धेवर जनार्दन महाराजांचा प्रहार यावेळी जनार्दन महाराजांनी अंधश्रद्धेवरही भाष्य करत समाजाला महत्त्वपूर्ण संदेश दिला. "विद्यार्थ्यांनी मला 'बाबा' म्हणावे, जेणेकरून समाजात हा संदेश जाईल की प्रत्येक बाबा भोंदू नसतो. जर समाज



बाहेरून आलेल्या लोकांना करोडो रुपये देऊ शकतो, तर गरिबांच्या शिक्षणासाठी काम करणाऱ्यांच्या पाठीशीही ठामपणे उभे राहिले पाहिजे," असे त्यांनी स्पष्टपणे सांगितले. गरीब विद्यार्थ्यांच्या जीवनात शिक्षणाच्या माध्यमातून यशाचा प्रकाश पेरण्याचा निर्धारही त्यांनी व्यक्त केला. कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित असलेले राज्याचे वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे यांनी या उपक्रमाचे कौतुक केले. "आज स्पर्धा परीक्षा कोचिंग क्लासेसच्या वाढत्या फीमुळे ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थी मागे पडत आहेत. अशा परिस्थितीत नोबेल फाउंडेशन आणि जयदीप पाटील यांनी उचललेले हे पाऊल अत्यंत कौतुकास्पद आहे. भविष्यात प्रत्येक तालुक्यात अशा प्रकारची केंद्रे सुरू व्हावीत यासाठी मी स्वतः प्रयत्न करेन," अशी ग्वाही त्यांनी दिली. यावेळी आमदार राजूमामा भोळे यांनी या प्रकल्पाचे स्थानिक पालकत्व स्वीकारल्याचा आनंद व्यक्त केला, तर आमदार अमोल जावळे यांनीही संस्थेच्या पाठीशी कायम उभे राहण्याचे आश्वासन दिले. नोबेल फाउंडेशनचे संस्थापक Jaydeep Patil यांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले की, "मी स्वतः ग्रामीण भागातून आणि गरिबीतून शिक्षण घेत इथपर्यंत पोहोचलो आहे. आपण पुढे गेल्यानंतर मागे राहिलेल्यांना हात देणे हीच खरी संस्कृती आणि आई-वडिलांचे संस्कार आहेत."

### विद्यार्थ्यांना ग्रंथभेट, मान्यवरांची उपस्थिती

या कार्यक्रमाला श्यामचैतन्य महाराज, उपमहापौर मनोज चौधरी, जैन उद्योग समूहाचे मीडिया उपाध्यक्ष अनिल जोशी, रायसोनी विद्यालयाचे डीन संजय शेखावत, उद्योजक प्रवीणभाई पटेल, कांतीभाई पटेल, एस. जे. पाटील, सचिव संजय महाजन यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान गरजू विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांच्या पुस्तकांचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कॅप्टन राजेंद्रसिंग राजपूत यांनी केले, तर आभार प्रदर्शन शैलेंद्र महाजन यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी रमेश पाटील, राजेंद्र पाटील, प्रशांत पाटील आणि प्रेम मराठे यांनी विशेष परिश्रम घेतले.

दैनिक जन सम्राट टाईम्स
सत्याचे प्राईम्स


Selected

## पर्यावरण संवर्धन समितीच्या जनसंपर्क अधिकारीपदी : चौधरी

जळगाव : निवड

जळगाव : पर्यावरण संवर्धन व विकास समितीचे अध्यक्ष तथा पत्रकार डी. के. आरिकर यांच्या आदेशाने तसेच उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष सुखदेव लक्ष्मण भालेराव (पत्रकार), उत्तर महाराष्ट्र सचिव, भूगोल अभ्यासक व संशोधक प्रा. योगेश दिनकर गोसावी आणि जळगाव जिल्हाध्यक्ष देवेंद्र सुरेखा मधुकर वराडे (अप्पा) यांच्या मार्गदर्शनाखाली दिलीप मधुकरराव चौधरी यांची पर्यावरण संवर्धन व विकास समितीच्या जळगाव जिल्हा जनसंपर्क अधिकारी या पदावर नियुक्ती करण्यात आली आहे. दिलीप चौधरी हे माजी कृषी अधिकारी असून पर्यावरण संवर्धन, वृक्षारोपण, जैवविविधता जतन तसेच सामाजिक प्रश्नांवर सातत्याने कार्य करणारे अभ्यासू आणि सक्रिय कार्यकर्ते म्हणून ओळखले जातात. कृषी क्षेत्रातील त्यांच्या दीर्घ अनुभवासोबतच पर्यावरण विषयक जनजागृती आणि सामाजिक बांधिलकीमुळे त्यांच्या निवडीचे सर्व स्तरांतून स्वागत होत आहे.

### उपवर्गीकरण रद्द करण्यासाठी राज्यव्यापी रणशिंग; २६ जूनला आझाद मैदानावर महासभेची घोषणा

# 10 जूनला दहा लाखांचे निळे वादळ मंत्रालयावर धडकणार!

## अनुसूचित जाती एकता समितीचा 'बीड ते मुंबई' लॉंग मार्च जाहीर

जन सम्राट टाईम्स



**मुंबई | प्रतिनिधी:** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या नागसेनवन येथे अनुसूचित जाती एकता समितीची राज्यस्तरीय महत्त्वपूर्ण बैठक उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. राज्यभरातील आंबेडकरी संघटना, सामाजिक संस्था, कर्मचारी संघटना, युवक प्रतिनिधी तसेच विविध राजकीय पक्षांच्या पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत झालेल्या या बैठकीत अनुसूचित जातींच्या हक्कांसाठी व्यापक संघर्ष उभारण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. बैठकीत अनुसूचित जातींचे उपवर्गीकरण रद्द करणे, पदोन्नतीमधील आरक्षण तातडीने लागू करणे तसेच संविधानिक हक्कांच्या संरक्षणासाठी राज्यव्यापी आंदोलन उभारण्यावर सविस्तर चर्चा झाली. राज्य सरकारने सामाजिक न्यायाच्या प्रश्नांवर स्पष्ट भूमिका घ्यावी, अशी जोरदार मागणी यावेळी करण्यात आली. बैठकीतील सर्वात महत्त्वाचा निर्णय म्हणजे "बीड ते मुंबई लॉंग मार्च" काढण्याचा. अनुसूचित जातींच्या एकतेसाठी आणि उपवर्गीकरणाच्या विरोधात हा ऐतिहासिक लॉंग मार्च दि. १० जून २०२६ रोजी बीड येथून सुरू होणार असून दि. २६ जून रोजी Mumbai येथे त्याचा समारोप होणार आहे. "चलो मंत्रालय"च्या घोषणेसह निघणाऱ्या या मोर्चात राज्यभरातून लाखो समाजबांधव सहभागी होणार असल्याचा दावा आयोजकांनी केला आहे. मुंबईतील आझाद मैदान येथे २६ जून रोजी दहा लाख लोकांच्या उपस्थितीत भव्य जाहीर सभा आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती बैठकीत देण्यात आली. या लॉंग मार्चचा मार्ग बीड, मांजरसुंबा, पाटोदा, जामखेड, आष्टी, धानोरा, अहिल्यानगर, सुपा, शिरूर, भीमा कोरेगाव, पुणे, चिंचवड, तळेगाव दाभाडे, लोणावळा, खोपोली, पनवेल, ठाणे, मार्गे मुंबई असा निश्चित करण्यात आला आहे. मार्चदरम्यान विविध ठिकाणी सभा, जनसंवाद, संविधान जागर अभियान आणि सामाजिक एकतेचे कार्यक्रम आयोजित करण्यात येणार असल्याचे आयोजकांनी स्पष्ट केले. लॉंग मार्च यशस्वी करण्यासाठी राज्यभर व्यापक जनजागृती अभियान राबविण्याचा निर्णय बैठकीत घेण्यात आला. गावागावांत बैठका, युवक मेळावे, संविधान जनजागृती यात्रा तसेच सोशल मीडियाच्या माध्यमातून आंदोलनाची भूमिका जनतेपर्यंत पोहोचवली जाणार आहे. विशेषतः तरुण वर्ग आणि विद्यार्थ्यांना आंदोलनात सक्रिय सहभागी करून घेण्यासाठी स्वतंत्र नियोजन करण्यात येणार असल्याचेही सांगण्यात आले. बैठकीत वक्त्यांनी अनुसूचित जातींमध्ये फूट पाडणारे उपवर्गीकरण समाजहिताच्या विरोधात असल्याचा आरोप केला.

### सरकारने यावर तातडीने निर्णय घ्यावा

राज्य सरकारने सामाजिक न्यायाच्या प्रश्नांवर स्पष्ट भूमिका घ्यावी, अशी जोरदार मागणी यावेळी करण्यात आली. बैठकीतील सर्वात महत्त्वाचा निर्णय म्हणजे "बीड ते मुंबई लॉंग मार्च" काढण्याचा. अनुसूचित जातींच्या एकतेसाठी आणि उपवर्गीकरणाच्या विरोधात हा ऐतिहासिक लॉंग मार्च दि. १० जून २०२६ रोजी बीड येथून सुरू होणार असून दि. २६ जून रोजी समारोप होणार आहे. संविधानाने दिलेल्या आरक्षणाच्या हक्कांवर कुठलाही आघात सहन केला जाणार नाही, असा इशाराही यावेळी देण्यात आला. पदोन्नतीमधील आरक्षणाचा प्रश्न अनेक वर्षांपासून प्रलंबित असून सरकारने यावर तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी आंदोलकांनी केली.

### आंदोलनाकडे राज्याचे लक्ष

राज्यातील सामाजिक आणि राजकीय वर्तुळात या लॉंग मार्चची जोरदार चर्चा सुरू झाली असून आगामी काळात हे आंदोलन राज्य सरकारसमोर मोठे आव्हान उभे करू शकते, अशी शक्यता व्यक्त केली जात आहे. विशेषतः मंत्रालयावर धडक देण्याच्या घोषणेमुळे प्रशासनही सतर्क झाल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

### विविध संघटनांचा मोठा सहभाग

या बैठकीस अशोक कांबळे, अरुण गाडे, दिनकर ओंकार, सुनिल वाकेकर, विश्वदिप करंजीकर, सिद्धार्थ शिनगारे, सचिन निकम, विजय वाहुळ, अनिल पळसपगार, रमेश गायकवाड, बलराज दाभाडे, कुणाल राऊत, अजय सरवदे, संदीप जाधव, प्रेम कांबळे, भिमराव गाडेकर, गौतम बावसकर, विलास गिऱ्हे, विनोद बनसोड, राहुल सोनवणे, सुशील तायडे, उमेश सरदार, धनंजय जाधव, हनुमंत पाटील, शेखर खैरनार, दादासाहेब शिंदे, सतिश गायकवाड, अभय शेलार, धम्मनंद जाधव, अविनाश गरुड, राहुल जाधव, संकेत खापर्डे यांच्यासह रिपब्लिकन सेना, VBA, भीम आर्मी आणि विविध सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जन सम्राट टाईम्स | ब्रेक न्यूज | ज

# डिझेल टंचाईने खरीप हंगाम धोक्यात

## ट्रॅक्टर शेतातच बंद, शेतकरी हवालदिल

जन सम्राट टाईम्स



**छत्रपती संभाजीनगर :** खरीप हंगामाच्या तोंडावर छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात गंभीर डिझेल टंचाई निर्माण झाली असून शेतकऱ्यांसमोर मोठे संकट उभे ठाकले आहे. अनेक पेट्रोल पंपांवर डिझेल उपलब्ध नसल्याने ट्रॅक्टर शेतातच उभे राहिले आहेत. नांगरणी, मशागत आणि पेरणीपूर्व कामे ठप्प झाल्याने शेतकरी संतप्त झाले असून प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करावा, अशी मागणी जोर धरत आहे. खुलताबाद तालुक्यातील मावसाळा, सराई, वेरूळ परिसरात गेल्या दोन दिवसांपासून डिझेलचा तुटवडा तीव्र झाला आहे. अनेक शेतकरी हातात प्लास्टिकचे कॅन घेऊन पेट्रोल पंपांवर तासन्तास रांगेत उभे असल्याचे चित्र दिसत आहे. डिझेलचा टँकर आल्यानंतर काही वेळातच पंप 'ड्राय' होत असल्याने नागरिक आणि शेतकऱ्यांची प्रचंड गैरसोय होत आहे. मावसाळा येथील तरुण शेतकरी आदित्य श्रीखंडे यांनी आपली व्यथा मांडताना सांगितले की, "खरीप हंगामासाठी नांगरणी सुरू केली होती. अर्धे शेत तयार झाले; मात्र अचानक डिझेल संपले. गेल्या दोन दिवसांपासून ट्रॅक्टर शेतात उभाच आहे. खुलताबाद, वेरूळ, सराई परिसरातील अनेक पंपांवर हेलपाटे मारले, पण कुठेही डिझेल मिळत नाही." आदित्य यांनी सांगितले की, काही दिवसांपूर्वी डिझेलचा टँकर येणार असल्याची माहिती मिळाल्याने ते रात्रभर पेट्रोल पंपावर थांबले होते; मात्र टँकरच न आल्याने निराश होऊन परतावे लागले. "पूर्वी बैलजोडी होती, पण ती सांभाळणे परवडत नसल्याने ट्रॅक्टर घेतला. आता ट्रॅक्टरलाच डिझेल मिळत नाही," अशी खंत त्यांनी व्यक्त केली. डिझेल टंचाईचा थेट परिणाम शेतीच्या कामांवर होत असून मशागतीचे संपूर्ण गणितच बिघडले आहे. अनेक ट्रॅक्टर चालकांनी "डिझेल आणा आणि नांगरणी करून घ्या" अशी अट घातली आहे. याशिवाय नांगरणीचे दरही वाढले असून प्रतितास ६०० रुपयांवरून ७०० ते ८०० रुपये आकारले जात असल्याची माहिती शेतकऱ्यांनी दिली.

### डिझेल पुरवठा उपलब्ध करून द्यावा

दरम्यान, काही पेट्रोल पंप चालकांनी डिझेलचा अतिरिक्त साठा टाळण्यासाठी केवळ वाहनांमध्येच डिझेल भरण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र शेतात किंवा रस्त्यात बंद पडलेले ट्रॅक्टर पंपापर्यंत कसे आणायचे, असा सवाल शेतकरी उपस्थित करत आहेत. या परिस्थितीमुळे शेतकरी संघटनांनीही आक्रमक भूमिका घेतली आहे. शेतकरी संघटनेचे जगदीश डवले, चिंचोलीचे माजी सरपंच प्रभू वाघ, कृष्णा वाघ, शिवाजी डवले, श्रीमंत पठाडे, विलास शेळके, विश्वंभर हाके, गणेश हाके आणि बद्रीनाथ ढाकणे यांनी प्रशासनाने तातडीने पुरेसा डिझेल पुरवठा उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी केली आहे.

# मुंबई-आग्रा महामार्गावर अपघात: सहा ठार, २६ प्रवासी जखमी

## लळिंग घाटात विरुद्ध दिशेने आलेल्या वाळूच्या डंपरमुळे दुर्घटना; मदतीला धावलेल्या टोल कर्मचाऱ्यांचाही मृत्यू

जन सम्राट टाईम्स



**धुळे । प्रतिनिधी:** मुंबई-आग्रा राष्ट्रीय महामार्गावर रविवारी पहाटे भीषण तिहेरी अपघात होऊन सहा जणांचा मृत्यू तर २६ प्रवासी गंभीर जखमी झाल्याची दुर्दैवी घटना घडली. लळिंग घाट परिसरात विरुद्ध दिशेने येणाऱ्या वाळूने भरलेल्या डंपरमुळे हा भीषण अपघात घडल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. अपघातानंतर महामार्गावर मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी झाली होती. मिळालेल्या माहितीनुसार, पहाटे सुमारे तीन वाजेच्या सुमारास लळिंग घाटात वाहतूक कोंडी झाल्याने वाळूने भरलेला डंपर चुकीच्या दिशेने जात होता. याचवेळी समोरून येणाऱ्या दारूने भरलेल्या ट्रकला डंपरची जोरदार धडक बसली. या धडकेनंतर दोन्ही वाहनांचे मोठे नुकसान झाले आणि रस्त्यावर गोंधळ उडाला. अपघातानंतर जखमींना मदत करण्यासाठी टोल कर्मचारी आणि स्थानिक नागरिकांनी धाव घेतली. मात्र काही क्षणांतच मागून वेगात येणारी ट्रॅव्हल्स बस नियंत्रण सुटल्याने थेट दारूच्या ट्रकवर आदळली. त्यामुळे मदतकार्य करणाऱ्यांनाही या अपघाताचा फटका बसला आणि दोन जणांचा जागीच मृत्यू झाला. या भीषण दुर्घटनेत लक्झरी बस चालक जावेद खान (वय ४३, रा. बडवाणी, मध्य प्रदेश), अपघातग्रस्तांना मदत करणारे मनोज नरवाल (वय ३२, रा. टोकरे, मालेगाव) तसेच टोल कर्मचारी गणेश हिरामण थोरात (वय ३५, रा. हटकर वाडी, चितोड रोड, धुळे) यांच्यासह अन्य तिघांचा मृत्यू झाला आहे. मृतांचा आकडा वाढण्याची भीतीही व्यक्त केली जात आहे.

या अपघातात सुरभी महाजन, शिवाय महाजन, दीपक वालकाय, सपना महाजन, अनिता वालकाय, विजय सिंग, तब्रिश अन्सारी, सपना दिवान, इमरान खान, भावना हटकर, हुसेना, सामीन सय्यद, शकीला सय्यद, सय्यद आयुब, शैलेश आक्य, जेबन अली, मुस्कान खान, अनिल वर्मा, अरविंद जैन, अजय कुमार, सईद मोहम्मद, अंकित राजपूत, अभिजीत आपटे, कनक सोनी आणि संगीता सोनी यांच्यासह २६ जण जखमी झाले असून त्यांच्यावर भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय येथे उपचार सुरू आहेत. दरम्यान, अपघातग्रस्त ट्रॅव्हल्स बसमध्ये २६ प्रवासी प्रवास करत असल्याची माहिती समोर आली आहे. काही प्रत्यक्षदर्शींनी ट्रॅव्हल्स चालकाला झोप लागल्याचा आरोप केला असून पोलिसांकडून या दृष्टीनेही तपास सुरू करण्यात आला आहे. अपघातानंतर महामार्गावर रक्ताचा सडा पडल्याचे भीषण दृश्य पाहायला मिळाले. घटनास्थळी नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. मोहाडी पोलिस स्टेशन पोलिसांसह वरिष्ठ पोलीस अधिकारी, टोल प्रशासन आणि बचाव पथके तातडीने घटनास्थळी दाखल झाली. जखमींना बाहेर काढून रुग्णालयात हलवण्यासाठी मोठे बचावकार्य राबविण्यात आले. दरम्यान, अपघातग्रस्तांना मदत करताना टोल कर्मचाऱ्यांचाही मृत्यू झाल्याने टोल कर्मचाऱ्यांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले. सुरक्षेच्या आवश्यक साधनसामग्रीचा अभाव असल्याचा आरोप करत काही काळ महामार्ग रोखून आंदोलन करण्यात आले.

# आंबिवलीत चार महिन्यांपासून पाणीपुरवठा विस्कळीत!

जन सम्राट टाईम्स

**कल्याण | प्रतिनिधी :** कल्याण-डोंबिवली महापालिका क्षेत्रातील आंबिवली परिसरात गेल्या चार महिन्यांपासून पाणीपुरवठा सातत्याने विस्कळीत होत असल्याने संतप्त नागरिकांनी अखेर आंदोलनाचा मार्ग स्वीकारला. आंबिवलीतील महिला आणि नागरिकांनी थेट 'अ' प्रभाग कार्यालयात धडक देत ठिय्या आंदोलन करत प्रशासनाविरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली. आंबिवलीतील अटाळी परिसर, शंभू पाटील चाळ, साईकृपा चाळ, धर्मात्मा नगर, ज्योतिर्लिंग चाळ आदी भागांमध्ये अनेक दिवसांपासून नियमित पाणीपुरवठा होत नसल्याने नागरिकांचे हाल होत आहेत. वारंवार तक्रारी करूनही महापालिका प्रशासनाकडून कोणतीही ठोस दखल घेतली जात नसल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला. "बेकायदेशीर नळजोडण्यांमुळे आम्हाला पाणी मिळत नाही" परिसरातील काही भागांत मोठ्या प्रमाणावर बेकायदेशीर नळजोडण्या करण्यात आल्याचा गंभीर आरोप नागरिकांनी केला आहे. अनधिकृत बांधकामांना चोरून पाणीपुरवठा केला जात असून त्याचा फटका नियमित कर भरणाऱ्या नागरिकांना बसत असल्याचे आंदोलनकर्त्यांचे म्हणणे आहे. "आम्ही नियमित घरपट्टी आणि पाणीपट्टी भरत असूनही पुरेशा प्रमाणात पाणी मिळत नाही. मात्र, अनधिकृत जोडण्यांमुळे पाण्याचा तुटवडा निर्माण होत आहे," अशी संतप्त प्रतिक्रिया रेशमा बोत्रे आणि जयश्री ढेकळे यांनी व्यक्त केली. महिलांचे हाल; पाण्यासाठी भटकंती पाणीटंचाईमुळे महिलांना आणि ज्येष्ठ नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. "घरातील लहान मुले, वृद्ध व्यक्ती आणि महिलांचे प्रचंड हाल होत आहेत. पाण्यासाठी दररोज भटकंती करावी लागत आहे.

# जळगाव जामोदमध्ये हृदयद्रावक घटना

## चार चिमुकल्यांना विहिरीत ढकलून पित्याची आत्महत्या

जन सम्राट टाईम्स




**जळगाव जामोद | प्रतिनिधी:** बुलढाणा जिल्ह्यातील जळगाव जामोद तालुक्यात रविवारी अत्यंत हृदयद्रावक घटना घडली. कौटुंबिक वादातून संतापाच्या भरात एका पित्याने आपल्या चार चिमुकल्या मुलांना विहिरीत ढकलून दिल्यानंतर स्वतःही आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे.

या घटनेत पाचही जणांचा मृत्यू झाला असून संपूर्ण परिसरात शोककळा पसरली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, जळगाव जामोद तालुक्यातील भाले अंजन गावातील विजय मुसा किराडिया यांनी आपली मुले प्रित किराडिया, प्राची किराडिया, पूर्वी किराडिया आणि पियुष किराडिया यांना घेऊन राजुरा धरण परिसरातील एका शेतातील विहिरीजवळ नेले. तेथे त्यांनी आधी चारही मुलांना विहिरीत ढकलून दिले आणि त्यानंतर स्वतःही आत्महत्येचा प्रयत्न केला. या दुर्दैवी घटनेत पाचही जणांचा मृत्यू झाला. पत्नी माहेरी गेल्याने मानसिक तणाव पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, विजय किराडिया यांचे शनिवारी रात्री पत्नीशी जोरदार भांडण झाले होते. त्यामुळे विजय मानसिक तणावात असल्याचे सांगितले जात आहे. रविवारी सकाळी त्यांनी मुलांना चहा करून दिला. त्यानंतर घरातील काम करत असताना त्यांच्या वडिलांनी "तू स्वतः काम का करतोस? तुझी पत्नी कुठे गेली?" असा प्रश्न विचारला. यानंतर विजय अधिकच अस्वस्थ झाले आणि त्यांनी टोकाचे पाऊल उचलल्याची माहिती समोर आली आहे. आधी मुलांना विहिरीत ढकलले, नंतर स्वतः उडी संतापाच्या भरात विजय यांनी चारही मुलांना घेऊन जवळील विहीर गाठली. तेथे त्यांनी मुलांना एकामागून एक विहिरीत ढकलून दिले. त्यानंतर स्वतः दोरीच्या साहाय्याने गळफास घेण्याचा प्रयत्न केला. मात्र, वजनामुळे दोरी तुटल्याने तेही विहिरीत कोसळले. त्यामुळे पाचही जणांचा पाण्यात बुडून मृत्यू झाला. शेतमालकाला दिसले धक्कादायक दृश्य घटनेनंतर काही वेळाने शेतमालक तेथे पोहोचले असता विहिरीजवळ मोबाईल, चपला आणि तुटलेली दोरी पडलेली दिसली. संशय आल्याने त्यांनी विहिरीत डोकावून पाहिले असता पाच मृतदेह दिसून आले.

### पोलिसांची धाव, तपास सुरू

माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत बचावकार्य सुरू केले. स्थानिकांच्या मदतीने पाचही मृतदेह विहिरीबाहेर काढण्यात आले. मृतदेह शवविच्छेदनासाठी जळगाव जामोद ग्रामीण रुग्णालयात पाठवण्यात आले असून पोलिसांकडून या घटनेचा पुढील तपास सुरू आहे. या घटनेमुळे भाले अंजन गावासह संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. चार निष्पाप चिमुकल्यांसह एका कुटुंबाचा दुर्दैवी अंत झाल्याने नागरिकांमध्ये शोक व्यक्त केला जात आहे.

जन सम्राट टाईम्स | अँकर न्यूज | ज

# पुण्यात JITO National Job Fair 2026 ला उत्स्फूर्त प्रतिसाद

## ६५ कंपन्या आणि ७०० उमेदवारांचा सहभाग; ऑनलाइन-ऑफलाइन माध्यमातून भव्य आयोजन

जन सम्राट टाईम्स



**पुणे । प्रतिनिधी :** रोजगाराच्या वाढत्या संधी निर्माण करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या JITO National Job Fair 2026 ला पुण्यात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. JITO Pune Chapter चे चेअरमन इंद्रकुमार छाजेड आणि मुख्य सेक्रेटरी दिनेश ओसवाल यांच्या नेतृत्वाखाली हा भव्य जॉब फेअर यशस्वीरीत्या पार पडला. या उपक्रमामुळे सुमारे ३०० उमेदवारांना विविध नामांकित कंपन्यांमध्ये रोजगाराची संधी मिळाल्याची माहिती आयोजकांकडून देण्यात आली. या जॉब फेअरमध्ये देशभरातील जवळपास ६५ कंपन्यांनी सहभाग घेतला होता. तसेच सुमारे ७०० उमेदवारांनी ऑनलाइन आणि ऑफलाइन माध्यमातून नोंदणी करून मुलाखती दिल्या. विविध क्षेत्रांतील रोजगाराच्या संधी एकाच व्यासपीठावर उपलब्ध झाल्याने युवकांनी या उपक्रमाचे स्वागत केले. या यशस्वी आयोजनामागे JITO जॉब्स पुणेचे डायरेक्टर उमेश बोरा, निमंत्रक महेंद्र सुंदेचा मुथा आणि पराग दोशी यांचे विशेष योगदान राहिले. रोजगार मेळाव्याचे नियोजन, कंपन्यांशी समन्वय आणि उमेदवारांच्या व्यवस्थापनाची जबाबदारी त्यांनी प्रभावीपणे सांभाळली. हा कार्यक्रम कृष्णा डायग्नोस्टिक्स यांच्या प्रायोजकत्वाखाली पार पडला. पल्लवी जैन आणि यशजी मुथा यांच्या सहकार्यामुळे कार्यक्रम अधिक भव्य आणि प्रभावी ठरल्याचे आयोजकांनी सांगितले. कार्यक्रमाला JITO अपेक्सकडून प्रेसिडेंट विजय भंडारी, एपेक्स डायरेक्टर राजेश साकला, प्रियांक परमार आणि सुजीत भटेवरा यांनी उपस्थित राहून मार्गदर्शन केले. त्यांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाला विशेष प्रतिष्ठा लाभली. यावेळी पुणे चॅप्टरमधील मनोज छाजेड, अजय मेहता, रवींद्र दुगड, अमित भटेवरा, प्रवीण चोरबेले, आनंद चोरडिया, अनिल भन्साळी, खुशाली चोरडिया, JITO यूथ चेअरमन आकाश ओसवाल, लेडीज विंग चेअरमन एकता भन्साळी, सेक्रेटरी रीताजी जैन, ट्रेझरर वंदनाजी राठोड, पूनम ओसवाल आणि लकीशाजी मंडलेचा यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते. तसेच ROM Job Convener अमित लोढा यांचेही या आयोजनात महत्त्वपूर्ण योगदान राहिले.

### या मान्यवरांची होती कार्यक्रमाला उपस्थिती

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ. सोनिका शहा, सी.ए. प्रवीण शहा, प्रकाश बोरा, दिनेश मेहता, सचिन शहा, कुणाल ओस्तवाल, प्रणव जैन, प्रणय भंडारी, सोनिया लोढा आणि शीतल गादिया यांच्यासह अनेक सदस्यांनी परिश्रम घेतले. उमेदवार आणि कंपनी प्रतिनिधींसाठी नाश्ता, दुपारचे जेवण तसेच हाय-टीची उत्कृष्ट व्यवस्था JITO तर्फे विनामूल्य करण्यात आली होती. रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देतानाच युवकांना योग्य व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचा हा प्रयत्न भविष्यातही सुरू राहणार असल्याची भावना आयोजकांनी व्यक्त केली.

# आदर्श शाळेबाहेरील बेकायदेशीर वृक्षतोड!

जन सम्राट टाईम्स

**भुसावळ | प्रतिनिधी :** शहरातील आदर्श शाळेबाहेर असलेल्या तीन हिरव्यागार वृक्षांची विनापरवाना कत्तल करण्यात आल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला असून या प्रकरणी पर्यावरण संवर्धन व विकास समिती आक्रमक झाली आहे.

संबंधित शाळा प्रशासन व दोषींवर तात्काळ फौजदारी गुन्हा दाखल करावा, अन्यथा २८ मे २०२६ पासून भुसावळ नगरपरिषद कार्यालयासमोर आमरण उपोषण छेडण्यात येईल, असा इशारा समितीने दिला आहे.

यासंदर्भात समितीच्या वतीने मुख्याधिकारी तसेच प्रभारी नगराध्यक्ष यांना निवेदन देण्यात आ विशेष म्हणजे, नगरपरिषदेचे संबंधित अधिकारी श्री. धनराज बाविस्कर यांनीदेखील या वृक्षतोडीसाठी कोणतीही परवानगी देण्यात आलेली नसल्याचे स्पष्ट केले आहे. त्यामुळे संबंधितांवर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी अधिक तीव्र झाली आहे. संबंधित शाळेचे मुख्याध्यापक, संस्थाचालक आणि वृक्षतोड करणाऱ्यांविरोधात तात्काळ FIR दाखल करावा. २७ मे २०२६ पर्यंत ठोस आणि कायदेशीर कारवाई करावी. कारवाई न झाल्यास २८ मे रोजी सकाळी ११ वाजेपासून नगरपरिषद कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू करण्यात येईल.